# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** पडघा **Year (वर्ष):** 2019
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0186 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/06/2019 14:06 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** बुधवार
      **Date From (दिनांक पासून):** 28/11/2018
      **Time Period (कालावधी):** पहर 4
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/11/2018
      **Time From (वेळेपासून):** 10:54 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 11:05 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 17/06/2019 **Time (वेळ):** 13:40 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद** 019 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/06/2019 13:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 9 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालय, सावदगांव ,भिवंडी

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** नरेश सुदाम पाटील
   (b) **Father's Name (वडील का नाव) :** सुदाम पाटील
   (c) **Date/Year of Birth (जन्म** 1984 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
   **Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सावद, पोस्ट- आमणे, ,भिवंडी,पडघा,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सावद, पोस्ट- आमणे, ,भिवंडी,पडघा,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7744984747

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नामदेव कचरू जाधव | | वडील का नाम : कचरू जाधव | 1. आन्हेगाव, पोस्ट- पडघा,,भिवंडी,पडघा, ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

तक्रारदाराने आज रोजी माहीती दिल्याने

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

गुन्हा रजि नं 186/2019 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988( सशोधन 2018) चे कलम 7 प्रमाने फिर्यादि दिनांक 17/06/2019मी, श्री.नरेश सुदाम पाटील वय- 35 वर्षे, धंदा- शेती, रा. मु-सावद, पोस्ट- आमणे, ता. भिवंडी, जि. ठाणे, मो.क्र. 7744984747 फिर्याद देतो की, मी वरीलप्रमाणे असून वरीलनमूद ठिकाणी जन्मापासुन कुटुंबासह राहावयास आहे. माझी सावद गावामध्ये वडीलोपार्जित शेती व गोडावून आहे. त्यावर मिळणा-या उत्पन्नावर माझा व माझ्या कुटुंबाचा उर्दःनिर्वाह चालतो.मी व सौ.सरिता मधुकर पाटील, वय-30 वर्षे, धंदा-शेती, रा.पिसे, पोस्ट-आमणे, ता.भिवंडी, जि.ठाणे यांनी दिनांक 03/12/2015 रोजी सावद गांवामध्ये 1) श्रीमती ताराबाई पाडूरंग पाटील, वय 54 वर्षे, धंदा शेती व 2) श्री. रविंद्र पांडूरंग पाटील, वय-32 वर्षे, धंदा-शेती, दोघेही रा.- मौजे इताडे, ता.भिवंडी, जि.ठाणे याच्याकडून कब्जा सोडण्याचा करार करुन 7 गुंठे गुरचरण जमिन 80,000/- रू.ला विकत घेतली. त्यानंतर सदर जमिनीपैकी 3 गुंठे जमिन मी व सौ.सरिता पाटील यांनी दिनांक 09/10/2018 रोजी कब्जा सोडण्याचा करार करुन सौ. सुवर्णा प्रकाश ओव्हाळ, वय 46 वर्षे, रा. घर नं. 402, जुई लोढा गार्डन, मारुती मंदीरजवळ, कल्याण (प), जि. ठाणे यांना रु. 1,80,000/- रू. ला विकली. सदर जमीन विकल्यानंतर माझ्यात व सौ.सुवर्णा ओव्हाळ यांच्यामध्ये तोंडी करार झाला होता की, सौ.सुवर्णा ओव्हाळ यांनी सदर जागेवर घर बांधल्यानंतर टक्स पावती, विद्युत जोडणी तसेच इतर शासकिय काम मी करून देणार. त्यानंतर सौ.सुवर्णा ओव्हाळ यांनी सदर जागेवर दोन पाकी पत्र्याचे घर बांधले. त्यावेळी सदर घराला घरपट्टी लावून देण्यासाठी मी, ग्रामपंचायत कार्यालयात ये-जा करीत होतो. त्यानंतर सावद ग्रामपंचायतीमध्ये ठराव मंजूर होवून सौ.सुवर्णा प्रकाश ओव्हाळ यांनी बांधलेल्या घराला सावद ग्रामपंचायतीमधून घरपट्टी मंजूर झाली. त्यानंतर सदर घराला घरपट्टी पावती देण्याच्या प्रकरणावर शेरा मारण्यासाठी सावदगांवचे ग्रामसेवक श्री. नामदेव कचरू जाधव, वय-42 वर्षे, रा. मु. आन्हेगाव, पोस्ट- पडघा, ता. भिवंडी हे माझ्याकडे 30,000/- रुपये लाचेची मागणी करु लागले.मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांना मी टाळू लागलो. परंतु त्यांनी पुन्हा मला दिनांक 26/11/2018 रोजी 30,000/-रू.लाचेची मागणी केली.त्यामुळे मला ग्रामसेवक श्री. नामदेव कचरू जाधव-वय-42 वर्षे, रा. मु. आन्हेगाव, पोस्ट- पडघा, ता. भिवंडी यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, दिनांक 27/11/2018 रोजी अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथील कार्यालयात तक्रार दिली. त्यानंतर दिनांक 28/11/2018 रोजी मी दिलेल्या तक्रारीची दोन शासकिय पंचांसमक्ष पडताळणी करण्याचे ठरले. त्याप्रमाणे दिनांक 28/11/2018 रोजी 10.05 वा. पोलीस निरीक्षक श्री.दिपक बर्गे हे त्यांच्या स्टाफ व दोन शासकीय पंचासह शासकीय वाहनाने मी हजर असलेल्या ठिकाणी कल्याण कोर्ट येथे आले. त्यानंतर पो.निरी.श्री.बर्गे यांनी माझी त्यांच्या स्टाफ व पंचाशी ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझ्या खाजगी वाहनाने तर पो.निरी. बर्गे, त्यांचा स्टाफ व पंच असे शासकीय वाहनाने येथील कड बिजनेस क्लस्टर या कंपनी समोरील युनिटी इंडस्ट्रीयल पार्क, सावंद येथील माझ्या गोडावूनमध्ये आलो.त्यानंतर मपोना शेख यांनी मला व दोन्ही



Scanned by CamScanner

पंचांना डिजीटल व्हाईस रेकार्डरची माहिती दिली. डिजीटल व्हाईस रेकार्डर व मेमरी कार्डमध्ये कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करून दिली. त्यानंतर माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करून डिजीटल व्हाईस रेकार्डर मला 10.54वा. लावला. त्यानंतर मी व पंच नं. 1 कोळेकर असे ग्रामसेवक श्री.जाधव यांच्या कार्यालयात जावून, लोकसेवक श्री. जाधव यांची भेट घेतली असता, लोकसेवक श्री.जाधव, ग्रामसेवक सावदगांव ग्रामपंचायत, यांनी घरपट्टी बाबतचा मंजूर असलेल्या ठरावावर शेरा मारुन देण्यासाठी 30,000/- रुपये लाचेची मागणी पंच नं.1 श्री. कोळेकर यांच्या समक्ष करुन तडजोडीअंती 25,000/- रुपये सोमवारी किंवा मंगळवारी आणण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच असे शासकीय वाहनाजवळ येवून घडलेली हकीगत पो.निरी. बर्गे यांना सांगितली. त्यानंतर माझी तब्यत बरी नसल्याने मी लाचेच्या सापळा कारवाई कामी अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे या कार्यालयात आलो नाही. आता माझी खात्री झाली आहे की, लोकसेवक श्री.जाधव यांनी लाचेची मागणी करून बरेच दिवस झाल्याने ते आता लाचेची रक्कम स्विकारणार नाहीत. तरी मी, दिनांक 27/11/2018 रोजी अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 28/11/2018 रोजी 10.54 वा. ते 11.05 वा.चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत ग्रामसेवक श्री. जाधव, सावदगांव ग्रामपंचायत यांनी सौ.सुवर्णा ओव्हाळ यांनी बांधलेल्या घराच्या घरपट्टीबाबत मंजूर असलेल्या ठरावावर शेरा मारून देण्यासाठी माझेकडे 30,000/-रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती 25,000/-रू. लाचेची रक्कम ही सोमवार दिनांक 03/12/2018 किंवा मंगळवार दिनांक 04/12/2018 रोजी आणण्यास सांगितले. अशा प्रकारे ग्रामसेवक श्री.जाधव यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याने माझी त्यांच्या विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष हि फिर्याद दिली.

सहीपोलिस ठाणे अंमलदार पडघा पोलीस ठाणे ( नरेश सुदाम पाटील )दाखल अंमलदार -मपोहवा/2327 एम.जे.शिरसाट तपास- पोनि/दिपक बर्गे नेम-अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SURESH MANORE(I (Inspector)) / PCMAH79536 **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
पडघा पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** **(ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाम):** SURESH MANORE
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMAH79536



Scanned by CamScanner